19.11.2025 प्रभातःमुरली ओम शांती बापदादा मधुबन

"गोड मुलांनो - तुम्हाला सदैव आठवणीच्या फासावर लटकून राहायचे आहे, आठवणीनेच आत्मा खरे सोने बनेल"

प्रश्नः- कोणते बळ क्रिमिनल (विकारी) डोळयांना एका झटक्यात बदलते?

उत्तरः- ज्ञानाच्या तिसऱ्या नेत्राचे बळ जेव्हा आत्म्यामध्ये येते तेव्हा विकारीपणा समाप्त होतो. बाबांचे श्रीमत आहे - मुलांनो, तुम्ही सर्व आपसामध्ये भाऊ-भाऊ आहात, भाऊ-बहीणी आहात, तुमची दृष्टी कधीही क्रिमिनल (विकारी) होऊ शकत नाही. तुम्ही सदैव आठवणीच्या मस्ती मध्ये रहा. वाह भाग्य वाह! आम्हाला स्वयं भगवान शिकवत आहेत. असा विचार करा तर आनंदाचा पारा चढलेला राहील.

ओम् शांती. गोड-गोड रुहानी मुलांप्रती रुहानी बाबा समजावून सांगत आहेत. मुले जाणतात की, बाबा जे स्वतः देखील आत्माच आहेत, ते परफेक्ट आहेत त्यांच्यावर कोणताही गंज (कट) चढलेला नाहीये. शिवबाबा म्हणतील - माझ्यावर गंज चढलेला आहे? बिलकुल नाही. या दादामध्ये (ब्रह्मा बाबांवर) तर पूर्ण गंज चढलेला होता. यांच्यामध्ये बाबांनी प्रवेश केला आहे तर त्यांना मदत देखील मिळते. मूळ गोष्ट आहे ५ विकारांमुळे आत्म्यावर गंज चढून अपवित्र झाली आहे. तर जितकी-जितकी बाबांची आठवण कराल, तितकी गंज उतरत जाईल. भक्ती मार्गातील कथा तर जन्म-जन्मांतर ऐकत आला आहात. ही तर गोष्टच निराळी आहे. तुम्हाला आता ज्ञान सागराकडून ज्ञान मिळत आहे. तुमच्या बुद्धीमध्ये एम ऑब्जेक्ट आहे, आणखी कोणत्याही सत्संग इत्यादि ठिकाणी एम ऑब्जेक्ट नसतो. ईश्वर सर्वव्यापी आहे असे म्हणून माझी निंदा करत राहतात, ड्रामा प्लॅन अनुसार. मनुष्य हे देखील समजत नाहीत की हा ड्रामा आहे. यामध्ये क्रिएटर, डायरेक्टर देखील ड्रामाच्या अधीन आहेत. भले सर्वशक्तिमान असे गायन आहे - परंतु तुम्ही जाणता ते देखील ड्रामाच्या पट्ट्यावर चालत आहेत. बाबा जे स्वतः येऊन मुलांना समजावून सांगतात, म्हणतात - माझ्या आत्म्यामध्ये अविनाशी पार्ट नोंदलेला आहे त्यानुसार मी शिकवतो. जे काही समजावून सांगतो ते ड्रामामध्ये नोंदलेले आहे. आता तुम्हाला या पुरुषोत्तम संगमयुगावर पुरुषोत्तम बनायचे आहे. भगवानुवाच आहे ना. बाबा म्हणतात - तुम्हा मुलांना पुरुषार्थ करून असे लक्ष्मी-नारायण बनायचे आहे. असे इतर कोणताही मनुष्य म्हणू शकत नाही की तुम्हाला विश्वाचा मालक बनायचे आहे. तुम्ही जाणता आपण आलोच आहोत विश्वाचा मालक, नरापासून नारायण बनण्यासाठी. भक्ती मार्गामध्ये तर जन्म-जन्मांतर कथा ऐकत आला आहात, काहीच समजत नव्हते. आता समजता - बरोबर या लक्ष्मी-नारायणाचे राज्य स्वर्गामध्ये होते, आता नाहीये. त्रिमूर्तीसाठी देखील मुलांना समजावून सांगितले आहे. ब्रह्मा द्वारे आदि सनातन देवी-देवता धर्माची स्थापना होते. सतयुगामध्ये हा एक धर्म होता, इतर कोणतेही धर्म नव्हते. आता तो धर्म नाही आहे, पुन्हा स्थापना होत आहे. बाबा म्हणतात - मी कल्प-कल्पाच्या संगमयुगावर येऊन तुम्हा मुलांना शिकवतो. ही पाठशाळा आहे ना. इथे मुलांना कॅरॅक्टर (चारित्र्य) देखील सुधारायचे आहे. ५ विकारांना काढून टाकायचे आहे. तुम्हीच देवतांच्या समोर जाऊन गात होता - 'आप सर्वगुण संपन्न… हम पापी हैं'. भारतवासीच देवता होते. सतयुगामध्ये हे लक्ष्मी-नारायण पूज्य होते आणि मग कलियुगामध्ये पुजारी बनले. आता पुन्हा पूज्य बनत आहेत, पूज्य सतोप्रधान आत्मे होते. त्यांची शरीरे देखील सतोप्रधान होती. जशी आत्मा तसा दागिना. सोन्यामध्ये जेव्हा खाद (भेसळ) मिसळली जाते तेव्हा त्याचा भाव किती कमी होतो. तुमचा देखील भाव खूप जास्त होता. आता किती कमी भाव झाला आहे. तुम्ही पूज्य होता, आता पुजारी बनला आहात. आता जितके योगामध्ये रहाल तितका गंज उतरेल आणि बाबांवरील प्रेम वाढत जाईल, आनंद देखील होईल. बाबा स्पष्टपणे सांगतात - मुलांनो, चार्ट ठेवा की पूर्ण दिवसामध्ये आपण किती वेळ आठवण करतो? आठवणीची यात्रा, हा शब्द बरोबर आहे. आठवण करता-करता गंज निघता-निघता अंत मती सो गति होईल. ते तर पंडे लोक यात्रेवर घेऊन जातात. इथे तर आत्मा स्वतः यात्रा करते. आपल्या परमधाममध्ये जायचे आहे कारण ड्रामाचे चक्र आता पूर्ण होत आहे. हे देखील तुम्ही जाणता की ही खूप घाणेरडी दुनिया आहे. परमात्म्याला तर कोणीही जाणत नाहीत, ना जाणतील म्हणून म्हटले जाते - 'विनाश काले विपरीत बुद्धी'. त्यांच्यासाठी तर हा नरकच स्वर्गा प्रमाणे आहे. त्यांच्या बुद्धीमध्ये या गोष्टी टिकू शकत नाहीत. तुम्हा मुलांना हे सर्व विचार सागर मंथन करण्यासाठी खूप एकांत पाहिजे. इथे तर खूप चांगला एकांत आहे म्हणून मधुबनची महिमा आहे. मुलांना तर खूप आनंद झाला

पाहिजे. आम्हा जीव-आत्म्यांना परमात्मा शिकवत आहेत. कल्पा पूर्वी देखील असे शिकवले होते. श्रीकृष्णाची गोष्ट नाहीये. तो तर लहान मुलगा होता. तो आत्मा, हे परम-आत्मा. पहिल्या नंबरची आत्मा आहे - श्रीकृष्ण; तीच मग लास्ट नंबरमध्ये आली आहे. तर नाव देखील वेगळे झाले. अनेक जन्मांतील अंताच्या जन्मामध्ये नाव तर वेगळे असेल ना. म्हणतात - हे तर दादा लेखराज आहेत. हा आहेच अनेक जन्मांतील अंताचा जन्म. बाबा म्हणतात - मी यांच्यामध्ये प्रवेश करून तुम्हाला राजयोग शिकवत आहे. बाबा कोणामध्ये तरी येतील ना. शास्त्रांमध्ये या गोष्टी नाहीत. बाबा तुम्हा मुलांना शिकवतात, तुम्हीच शिकता. मग सतयुगामध्ये हे ज्ञान असणार नाही. तिथे आहे प्रारब्ध. बाबा संगमावरच येऊन हे नॉलेज ऐकवतात आणि नंतर तुम्ही पद प्राप्त करता. ही वेळच आहे बेहदच्या बाबांकडून बेहदचा वारसा प्राप्त करण्याची म्हणून मुलांनी गफलत (चूक) करता कामा नये. माया खूप चुका करायला लावते मग समजून येते त्यांच्या भाग्यामध्ये नाही आहे. बाबा तर तदबीर (पुरुषार्थ) करवून घेतात. भाग्यामध्ये किती फरक पडतो. कोणी पास, कोणी नापास होतात. डबल मुकुटधारी बनण्यासाठी पुरुषार्थ करावा लागतो.

बाबा म्हणतात - गृहस्थ व्यवहारामध्ये भले रहा. मुलांनाही लौकिक पित्याचे ऋण देखील फेडायचे आहे. लॉ फुल (नियमानुसार) चालायचे आहे. इथे तर सर्व आहे बेकायदेशीर. तुम्ही जाणता आपणच इतके उच्च पवित्र होतो, आणि मग घसरत आलो आहोत (पतन होत आले). आता पुन्हा पवित्र बनायचे आहे. प्रजापिता ब्रह्माची मुले सर्व बी. के. आहात तर मग क्रिमिनल दृष्टी (विकारी दृष्टी) असू शकत नाही कारण तुम्ही भाऊ-बहीणी झालात ना. हे बाबा युक्ती सांगतात. तुम्ही सर्वजण बाबा-बाबा म्हणता तर भाऊ-बहीणी झालात. भगवंताला सर्व ‘बाबा’ म्हणतात ना. आत्मे म्हणतात - आम्ही शिवबाबांची संतान आहोत. मग शरीरामध्ये आहोत तर भाऊ-बहीणी झालो. तर मग आपली क्रिमिनल दृष्टी (विकारी दृष्टी) का जावी. तुम्ही मोठ्या-मोठ्या सभांमध्ये हे समजावून सांगू शकता. तुम्ही सर्व भाऊ-भाऊ आहात, मग प्रजापिता ब्रह्मा द्वारा रचना रचली गेली, तर भाऊ-बहीणी झालात, दुसरे कोणतेही नाते नाही. आपण सर्व एका बाबांची मुले आहोत. एका बाबांची मुले मग विकारामध्ये कसे जाऊ शकतात. भाऊ-भाऊ देखील आहात तर भाऊ-बहीणी देखील आहात. बाबांनी समजावून सांगितले आहे हे डोळे खूप धोका देणारे आहेत. डोळेच चांगली वस्तू बघतात तर मग इच्छा होते. जर डोळ्यांनी बघितलेच नाही तर इच्छा देखील उत्पन्न होणार नाही. या क्रिमिनल डोळ्यांना (विकारी दृष्टीला) बदलावे लागते. भाऊ-बहीण काही विकारामध्ये तर जाऊ शकत नाहीत. ती दृष्टी नाहीशी झाली पाहिजे. ज्ञानाच्या तिसऱ्या नेत्राचे बळ पाहिजे. अर्धा कल्प या डोळ्यांनी काम केले आहे, आता बाबा म्हणतात - ही सारी कट (गंज) निघणार कशी? आपण आत्मे जे पवित्र होतो, त्यामध्ये गंज चढली आहे. जितकी बाबांची आठवण कराल तेवढे बाबांवर प्रेम जडेल. अभ्यासाने नाही, आठवणीने प्रेम जडेल. भारताचा आहेच प्राचीन योग, यादवारे आत्मा पवित्र बनून आपल्या घरी निघून जाईल. सर्व भावांनी आपल्या बाबांचा परिचय सर्वांना द्यायचा आहे. सर्वव्यापीच्या ज्ञानामुळे तर एकदम जोरदारपणे आपटले आहेत. आता बाबा म्हणतात - ड्रामानुसार तुमचा पार्ट आहे. राजधानी अवश्य स्थापन होणार आहे. जितका कल्पापूर्वी पुरुषार्थ केला आहे, तितकाच ते करतील जरूर. तुम्ही साक्षी होऊन बघत राहता. या प्रदर्शनी इत्यादी तर खूप बघत राहाल. तुमची ईश्वरीय मिशन आहे. हे आहे इनकॉर्पोरियल गॉडफादरली मिशन (निराकारी ईश्वरीय कार्य). ते असते ख्रिश्चन मिशन, बौद्धि मिशन. ही आहे इनकार्पोरियल ईश्वरी मिशन. निराकार तर जरूर कोणत्या शरीरामध्ये येतील ना. तुम्ही देखील निराकार आत्मे माझ्यासोबत राहणारे होता ना. हा ड्रामा कसा आहे? हे कोणाच्याही बुद्धीमध्ये नाही आहे. रावण राज्यामध्ये सर्वजण विपरीत-बुद्धी झाले आहेत. आता बाबांवर प्रेम करायचे आहे. तुमचा अंजाम (वायदा) आहे - ‘मेरा तो एक दुसरा न कोई’. नष्टोमोहा बनायचे आहे. खूप मेहनत आहे. हे जसे काही फाशीवर चढणे आहे. बाबांची आठवण करणे अर्थात फाशीवर चढणे. शरीराला विसरून बाबांच्या आठवणीमध्ये आत्म्याला निघून जायचे आहे. बाबांची आठवण खूप गरजेची आहे. नाहीतर गंज कशी उतरणार? मुलांना आनंद झाला पाहिजे - शिवबाबा आम्हाला शिकवत आहेत. कोणी ऐकेल तर म्हणेल हे काय म्हणत आहेत, कारण ते तर श्रीकृष्णाला भगवान समजतात.

तुम्हा मुलांना तर आता खूप आनंद होतो की आपण आता श्रीकृष्णाच्या राजधानीमध्ये जात आहोत. आम्ही देखील प्रिन्स-प्रिन्सेस बनू शकतो. तो आहे फर्स्ट प्रिन्स (पहिला राजकुमार). नवीन घरामध्ये राहतात. नंतर जी मुले जन्म घेतील ती तर उशिराने आली आहेत ना. जन्म स्वर्गामध्येच होईल. तुम्ही देखील स्वर्गामध्ये प्रिन्स बनू शकता. सगळेच काही पहिल्या नंबरमध्ये येणार नाहीत. नंबरवार माळा बनेल ना. बाबा म्हणतात - मुलांनो, खूप

पुरुषार्थ करा. इथे तुम्ही आला आहात नरापासून नारायण बनण्याकरिता. कथा देखील सत्यनारायणाची आहे. सत्य लक्ष्मीची कथा कधी ऐकली नसेल. प्रेम देखील सर्वांचे कृष्णावर आहे. श्रीकृष्णालाच पाळण्यामध्ये झुलवतात. राधेला का नाही? ड्रामा प्लॅन अनुसार तिचे नाव घेतले आहे. तुमची हमजीन्स तर राधा आहे तरी देखील प्रेम श्रीकृष्णावर आहे. तिचा ड्रामामध्ये पार्टच असा आहे. नेहमी मुलगे लाडके असतात. वडील मुलाला पाहून किती आनंदीत होतात. मुलगा झाला तर आनंद होईल, मुलगी झाली तर दुःखी होत राहतील. काही जण तर मारून देखील टाकतात. रावणाच्या राज्यामध्ये कॅरॅक्टरमध्ये किती फरक होतो. गातात देखील - 'आप सर्वगुण संपन्न...' आम्ही निर्गुण आहोत. आता बाबा म्हणतात - पुन्हा असे गुणवान बना. आता समजता आम्ही अनेकदा या विश्वाचे मालक बनलो आहोत. आता पुन्हा बनायचे आहे. मुलांना खूप आनंद झाला पाहिजे. ओहो! शिवबाबा आम्हाला शिकवत आहेत. याचेच बसून चिंतन करा. भगवान आम्हाला शिकवत आहेत, वाह भाग्य वाह! अशा प्रकारे विचार करत मस्ताना झाले पाहिजे (ईश्वरीय नशेमध्ये मश्गुल झाले पाहिजे). वाह भाग्य वाह! बेहदचे बाबा आम्हाला मिळाले आहेत, आम्ही बाबांची आठवण करतो. पवित्रता धारण करायची आहे. आम्ही हे बनत आहोत, दैवी गुण धारण करतो. हे देखील मनमनाभव आहे ना. बाबा आम्हाला हे बनवत आहेत. ही तर प्रॅक्टिकल अनुभवाची गोष्ट आहे.

गोड-गोड मुलांना सल्ला देतात - चार्ट लिहा आणि एकांतामध्ये बसून अशा आपल्याशी गोष्टी करा. हा बॅज तर छातीवर लावून ठेवा. भगवंताच्या श्रीमताद्वारे आम्ही हे बनत आहोत. यांना पाहून त्यांच्यावर प्रेम करत रहा. बाबांच्या आठवणीने आम्ही हे बनत आहोत. बाबा, तुमची तर कमाल आहे, बाबा आम्हाला यापूर्वी थोडेच माहीत होते की, तुम्ही आम्हाला विश्वाचा मालक बनवाल. नवधा भक्तीमध्ये तर दर्शनासाठी गळा कापायला, प्राण त्याग करायला तयार असतात तेव्हा दर्शन होते. अशांचीच ही भक्त माळा बनलेली आहे. भक्तांचा मान देखील आहे. कलियुगाचे भगत तर जणू बादशहा आहेत. आता तुम्हा मुलांचे बेहदच्या बाबांवर प्रेम आहे. एका बाबांशिवाय दुसऱ्या कशाचीही आठवण राहू नये. एकदम लाईन क्लिअर असली पाहिजे. आता आमचे ८४ जन्म पूर्ण झाले. आता आम्ही बाबांच्या आदेशावर पूर्णपणे चालणार. काम महाशत्रू आहे, त्याच्यासमोर हार खायची नाही. हार खाऊन मग पश्चाताप करून काय कराल? एकदम हाड न् हाड तुटून जाते. अतिशय कठोर सजा मिळते. गंज उतरण्या ऐवजी अजूनच वेगाने चढते. योग लागणार नाही. आठवणीमध्ये राहणे हे खूप मेहनतीचे काम आहे. बरेच जण गप्पा देखील मारतात - आम्ही तर बाबांच्या आठवणीमध्ये राहतो. बाबा जाणतात, असे कोणी राहू शकत नाही. यामध्ये मायेची खूप वादळे येतात. स्वप्न देखील अशी येतील, एकदम हैराण करतील. ज्ञान तर खूप सोपे आहे. छोटा मुलगा देखील समजावून सांगू शकेल. बाकी आठवणीच्या यात्रेमध्येच मोठा रोला (घोटाळा) आहे. खुश व्हायचे नाही की, आम्ही खूप सेवा करतो. गुप्त सेवा आपली (आठवणीची) करत रहा. यांना (ब्रह्मा बाबांना) तर नशा असतो - मी शिवबाबांचा एकटा मुलगा आहे. बाबा विश्वाचे रचयिता आहेत तर जरूर मी देखील स्वर्गाचा मालक बनणार. प्रिन्स बनणार आहे, या आंतरिक आनंदामध्ये राहिले पाहिजे. परंतु जितके तुम्ही मुले आठवणीमध्ये राहू शकता तितका मी राहू शकत नाही. बाबांना तर खूप विचार करावे लागतात (जबाबदारी पार पाडावी लागते). मुलांना कधी कोणा विषयी इर्षा देखील वाटता कामा नये की, बाबा मोठ्या व्यक्तींची खातिरदारी (पाहुणचार) का करतात. बाबा प्रत्येक मुलाची नाडी पाहून त्याच्या कल्याणार्थ प्रत्येकाला त्यानुसार वागवतात. टीचर जाणतो ना प्रत्येक विद्यार्थ्याला कसे वागवायचे आहे. मुलांना यामध्ये संशय येता कामा नये. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

१) एकांतामध्ये बसून आपणच आपल्याशी गोष्टी करायच्या आहेत. आत्म्यावर जो गंज चढला आहे त्याला काढण्यासाठी आठवणीच्या यात्रेवर राहायचे आहे.

२) कोणत्याही गोष्टीमध्ये संशय आणायचा नाही, इर्षा करायची नाही. आंतरिक आनंदामध्ये राहायचे आहे. आपली (आठवणीची) गुप्त सेवा करायची आहे.

वरदान:- बेगर टू प्रिन्सचा पार्ट प्रॅक्टिकलमध्ये बजावणारे त्यागी आणि श्रेष्ठ भाग्यशाली आत्मा भव

जसे भविष्यामध्ये विश्व महाराजन दाता असतील. तसे आता पासून दातापणाचे संस्कार इमर्ज करा. कोणाकडून कोणते सैलवेशन (सुविधा) घेऊन मग सुविधा देईन असे संकल्पामध्ये देखील नसावे, यालाच म्हटले जाते - बेगर टू प्रिन्स. स्वतःसाठी घेण्याची इच्छा असणारे नव्हे. या अल्पकाळाच्या इच्छेपासून बेगर. असा बेगरच संपन्न मूर्त आहे. जे आता बेगर टू प्रिन्स चा पार्ट प्रॅक्टिकलमध्ये बजावतात त्यांना म्हटले जाते - सदा त्यागी आणि श्रेष्ठ भाग्यशाली. त्यागामुळे कायमचे भाग्य स्वतः बनते.

बोधवाक्यः- सदैव हर्षित राहण्यासाठी साक्षीपणाच्या सीटवर द्रष्टा बनून प्रत्येक खेळ पहा.

||| ओम शांती |||

अव्यक्त इशारे:- अशरीरी आणि विदेही स्थितीचा अभ्यास वाढवा.

अशरीरी स्थितीचा अनुभव करण्यासाठी सूक्ष्म संकल्प रूपामध्ये देखील कुठे लगाव (मोह) नसावा, नात्याच्या रूपामध्ये, संपर्काच्या रूपामध्ये अथवा आपल्या कोणत्या विशेषते विषयी देखील मोह नसावा. जर आपल्या कोणत्या विशेषतेमध्ये देखील मोह असेल तर तो मोह देखील बंधन-युक्त करेल आणि तो मोह अशरीरी बनू देणार नाही.